किरकोळ दिवाणी अर्ज नं. ३/२०२४

गणपत सातपुते विरुध्द पांडुरंग सातपुते

**CNR:MHSN**14-000780-2023

## नि.क्र. १७ वरील आदेश

१. अर्जदार यांनी सदरचा अर्ज मूळ दावा फेर फैलावर घेणेकरीता दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज प्रलंबित असताना वि.प.नं. १ पांडुरंग चोखा सातपुते हे दि. १२/१२/२०२४ रोजी मयत झाले आहेत. याकामी मयत वि.प. यांचे वारसांना सामील करणे आवश्यक आहे. त्याकरीता सदर अर्जामध्ये नमूद वारसांबाबत दुरुस्ती करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सबब, वि.प.नं. १ पांडुरंग चोखा सातपुते यांचे नांवानंतर 'मयत वारस' असे वाचणेत येऊन त्यानंतर १.१ बबुताई पांडुरंग सातपुते, वय ७३, धंदा-घरकाम, १.२ आनंद पांडुरंग सातपुते वय ६०, धंदा-शेती, १.३ जितेंद्र पांडुरंग सातपुते, वय ५०, धंदा- शेती, १.४. अलका पांडुरंग सातपुते (लग्नापूर्वी), अलका भिमराव सोरुटे (लग्नानंतर), वय ५५, धंदा-घरकाम, रा. वारणा रेठरे, ता. शाहूवाडी, जि.कोल्हापूर, वि.प.नं. १.१ ते १.३ रा. रेड, ता.शिराळा, जि. सांगली असे सरळ व कायदेशीर वारस असून सदर अर्ज गुणदोषावर चालणेकरीता सदर वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. सबब वि.प.नं. १ यांचे वारस या अर्जाकामी रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२. जाबदारतर्फे सदर अर्जास प्रस्तुत अर्जावरच त्यांचे म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, अर्जदार यांनी वि.प.नं. १ यांना प्रस्तुत अर्जात नमूद वारस असलेबाबत कोणताही पुरावा दाखल केला नसलेने प्रस्तुत अर्ज नामंजूर करणेत यावा असे कथन केले आहे.

३. अर्जदार यांचा अर्ज, त्यावर जाबदार यांनी दिलेले म्हणणे वाचले. अर्जदार व जाबदारतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी जाबदार यांचेविरुध्द मूळ दावा फेर फैलावर घेणेकरीता दाखल केला आहे. दोन्ही बाजुंचे कथन तसेच वि.प.नं. १ चा मृत्यूचा दाखला पाहता निश्चितच अर्जदार यांना त्यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता विलंब झालेला आहे. अर्जदारतर्फे मृत्यू प्रमाणपत्र

वेळेत न मिळाल्यामुळे विलंब झाला व त्यामुळे वेळेत वि.प.नं. १ चे वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत असे कथन केले आहे. अर्ज मूळ दावा फेर फैलावर घेणेसाठी असल्यामुळे वि.प.नं. १ यांचे वारसांचा दावा मिळकतीशी हक्क हितसंबंध आहे व त्यामुळे त्यांना अर्जाचे कामी सामील करणे आवश्यक आहे. मात्र त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याकरीता झालेल्या विलंबाची भरपाई म्हणून जाबदार यांना अर्जदार यांनी रक्कम रु. ३००/- कॉस्ट देण्याचा आदेश करणे न्यायोचित होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## **आदेश**

अर्ज नि.क्र.१७ अर्जदार यांनी जाबदार यांना रक्कम रु. ३००/- कॉस्ट म्हणून देण्याच्या अटींवर मंजूर करण्यात येतो.

DESAI VINAYA ATMARAM

Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2025.09.10 18:06:16 +0530

शिराळा **(व्ही.ए.देसाई)**

दिनांक १०/०९/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, शिराळा

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M. S. Gondkar |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 10/09/2025 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 10/09/2025 |
| Order uploaded on | : | 11/09/2025 |